|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A'Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पुर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४-क/ रासेयो /का.अ.नियुक्ती १७/९१/२०२० दि.०३/०७/२०२०

ई-पत्र

**प्रति,**
**मा. प्राचार्य/ संचालक/विभाग प्रमुख,**
**राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक असलेले**
**महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग...**

**विषय :- राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्याच्या नियुक्ती संदर्भात...**

महोदय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य सुरू आहे. युवकांच्या भावनिक व मानसिक जडणघडणीत आणि सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून तयार झालेले स्वयंसेवक आज त्याची एक वेगळी व संस्कारक्षम ओळख करून देत आहेत. ही आपल्या सर्वांसाठी गौरवास्पद बाब आहे. या प्रक्रियेत कार्यक्रम अधिकारी यांची भूमिकाही तेवढीच महत्वाची आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य अधिक प्रभावी , अधिक संस्कारक्षम व अधिक शिस्तबध्द् व्हावे याकरीता विद्यापीठाचा सातत्याने प्रयत्न आहे.

शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये ज्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांचा कार्यकाळ पूर्ण झालेला आहे. त्या महाविद्यालयानी राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्गदर्शक पुस्तिकेतील तरतूदीनुसार (भाग- 6 , प्रकरण - 2) नवीन अध्यापकाची रा.से.यो कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्ती करून त्यांचा प्रस्ताव मान्यतेस्तव विद्यापीठाकडे पाठवावा. (मार्गदर्शक पुस्तीका www.nss.gov.in या संकेतस्थळावर भेट दिल्यास होम पेजवर उपलब्ध होईल)

- **रा.से.यो कार्यक्रम अधिकारी नियुक्त करतांना लक्षात घ्यावयाच्या आवश्यक बाबी -**

१. ज्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककातील विद्यार्थ्यांची मान्यताप्राप्त संख्या ही **३० ते १००** या दरम्यान असेल तेथे **एक कार्यक्रम अधिकारी** व एक **सहाय्यक कार्यक्रम अधिकारी महिला** यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच ज्या महाविद्यालयातील मान्यताप्राप्त विद्यार्थी संख्या ही **१०० पेक्षा अधिक** असेल तेथे **एक कार्यक्रम अधिकारी** व **दोन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी** (१ महिला, १ पुरूष) यांची नियुक्ती करण्यात यावी. ज्या अध्यापकाने राष्ट्रीय सेवा योजना एककात सहायक कार्यक्रम अधिकारी म्हणून सलग तीन वर्ष कालावधी पूर्ण केला असेल व ज्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे **उद्‌बोधन वर्ग(Orientation Course) / उजळणी वर्ग (Refresher Course)** प्रशिक्षण पुर्ण केले असेल त्यांची रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्ती करावी व त्यांच्या मान्यतेचा प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयास त्वरित सादर करावा.

२. एखाद्या अध्यापकाकडे राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.Comanding Officer) अधिकारी किंवा क्रीडा संचालक (Director of Sports) अशी जबाबदारी असेल तर त्यांची रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्ती करता येणार नाही. तसेच एकाच व्यक्तीकडे रासेयो कार्यक्रम अधिकारी (N.S.S.Prog. Officer) व विद्यार्थी विकास अधिकारी (Student Develpoment Officer) अशा दोन्ही जबाबदाऱ्या असता कामा नये. एखाद्या महाविद्यालयाने अशाप्रकारे नियुक्ती केली असल्यास ती तातडीने रद्द करावी. अन्यथा त्यास मान्यता दिली जाणार नाही.

३. कबचौउमवि अंतर्गत केवळ महिलांसाठी असलेल्या महाविद्यालयात रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून **महिला** अध्यापकाची तर पुरुष प्राध्यापकाची सहायक कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्ती करणे आवश्यक राहील.

४. रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्याचा कार्य कालावधी सलग तीन वर्षे राहील. त्यात त्यांनी वेळोवेळी विद्यापीठाच्या सूचनेनुसार सोपविलेली जबाबदारी पूर्ण करणे बंधनकारक राहिल. सलग तीन वर्ष कार्य कालावधी पूर्ण न करणाऱ्या कार्यक्रम अधिकाऱ्यांना विभागामार्फत प्रमाणपत्र अदा केली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

५. एखाद्या रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्याचा सलग तीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झालेला असेल तर त्यांना पुन्हा केवळ **एका वर्षासाठी पुर्ननियुक्ती देता येईल,** तथापि त्यांच्या कार्यकाळातील नाविन्यपूर्ण समाजोपयोगी उपक्रम तसेच एककातील स्वयंसेवकांचा विविध शिबीरे/उपक्रमांमधील सहभाग आदी बाबींचा अहवाल विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या पुर्ननियुक्तीबाबत मान्यतेची कार्यवाही केली जाईल.

६. राष्ट्रीय सेवा योजनेतील प्रत्येक कार्यक्रम अधिकाऱ्याचे ओरिएंटेशन/रिफ्रेशर कोर्स शासन मान्य प्रशिक्षण केंद्रात होणे आवश्यक आहे. याकरीता रासेयो राज्यस्तरीय विभागाने निर्धारीत केलेल्या अहमदनगर येथील प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेता येईल. त्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा तपशील या विभागाकडून अवगत करून घ्यावा. **तसेच या वर्षी ज्यांना रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यांनी याच वर्षी त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.**

७. रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून एखाद्या अध्यापकाचा कार्यकाळ पुर्ण झाला असेल तर त्यांची महाविद्यालयाच्या रासेयो सल्लागार समितीत सदस्य म्हणून नियुक्ती करावी. जेणेकरुन त्यांचा विद्यार्थी उपक्रमांशी सातत्याने संपर्क राहील व उपक्रम अंमलबजावणीत त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरू शकेल.

८. मा.प्राचार्य यांनी प्राध्यापकाची कार्यक्रम अधिकाऱ्याची नियुक्ती करतांना संबधीत प्राध्यापकास समाजकार्याची आवड असेल तसेच रवेळोवेळी विद्यापीठाने सांगीतलेल्या कार्यात तत्परता दर्शवणे,दिलेले काम वेळेवर करणे याच्या गांभीर्याने विचा र करावा.

राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या उपरोक्त निकषांची नोंद घेऊन महाविद्यालयांनी ज्या रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांचा कार्यकाळ तीन किंवा तीन वर्षा पेक्षा जास्त झालेला असेल त्यांना पदभारातून मुक्त करुन त्यांच्या जागी नवीन रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

नव्याने नियुक्त केलेल्या अध्यापकास रासेयो कार्यक्रम अधिकारी/ सहायक कार्यक्रम अधिकारी म्हणून मान्यता मिळण्याचा प्रस्ताव, त्यांचे परिचयपत्र (Bio-data) व त्यांना विद्यापीठाची व्याख्याता म्हणून मान्यता असलेल्या पत्राची छायांकित सत्यपत्र (University Approval letter) व कार्यभार हस्तांतर पत्र (Charge Handover Letter ) विद्यापीठ रासेयो कार्यालयाकडे **दि. १५जुलै,२०२०** पर्यंत पाठवावा. विद्यापीठाच्या मान्यतेनंतरच आपल्या महाविद्यालयास रासेयो अनुदानाची अग्रीम रक्कम पाठविली जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक व परिचयपत्र नमुना विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट दिल्यास circular link मध्ये Student Develpoment & NSS वर उपलब्ध आहे.

कळावे. धन्यवाद !

आपला विश्वासू,

**(डॉ.पंकजकुमार शां.नन्नवरे)**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

**सोबतः-स्वयंवृत्त (Bio Data)**

- **टिप** - ज्या रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांचा सलग तीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झालेला असेल, त्यांनी विद्यापीठाकडून कोरे
प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा.प्राचार्य यांच्या शिफारसीने **दि. १५ जुलै,२०२०** पर्यंत अर्ज सादर करावा. अर्जासोबत त्यांना रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून मान्यता मिळाल्याची रासेयो कार्यभार हस्तांतर पत्र ( Charge Handover Letter) व अहमदनगर येथे प्रशिक्षण पूर्ण केलल्या पत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहील.

**प्रत :-**

१) मा. राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रा.से.यो. मंत्रालय कक्ष, एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००१.

२) मा. संचालक,राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक कार्यालय, पहिला मजला, एन.सी.सी. ऑफीस जवळ, अे वसतीगृह कक्ष कृषि महाविद्यालय परिसर,शिवाजीनगर, पुणे -४११ ००५

३) मा. जिल्हा-विभागीय रा.से.यो. समन्वयक

४) विभाग प्रमुख,कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगाव

५) **विभाग प्रमुख**,प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव.

६)पध्दती विश्लेषक संगणकशास्त्र प्रशाळा उमवि, जळगाव.-सदर पत्रकास संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

**रासेयो कार्यक्रम अधिकारी / सहा.कार्यक्रम अधिकारी/ महिला कार्यक्रम अधिकारी स्वयंवृत्त**

**(Bio Data)**

| अलीकडील पासपोर्ट साईज रंगीत फोटो |
|---|

१) प्राध्यापकाचे नांव :- ------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ------------------------------------------

------------------------------------------

दूरध्वनी क्र. --------------- भ्रमणध्वनी क्र.------------------

Email ID : ------------------------------------------

३) जन्मतारीख :- -------------------------------------------------------

४) शैक्षणिक अर्हता :- -------------------------------------------------------

५) सेवेत नियुक्तीची तारीख :- -------------------------------------------------------

६) अध्यापनाचा विषय :- -------------------------------------------------------

७) गेल्या ३ वर्षात महाविद्यालयात केलेले नाविन्यपूर्ण कार्य :-(लागूअसल्यास)

----------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------

८) गेल्या ३ वर्षातील विद्यार्थीभिमुख व सामाजिक उपक्रमात सहभाग :-

----------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------

९) आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कोणकोणत्या समस्या जाणवतात ?

----------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------

११) रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी म्हणून निवड झाल्यास आपण भविष्यात कोणकोणते उपक्रम राबवू इच्छिता ?

----------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------

(----------------------------)

स्वाक्षरी

महाविद्यालय लेटर हेड

---------------------------------------------------------------------------------------------------

# हमीपत्र

विषय - राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांच्या नियुक्ती संदर्भात..

हमीपत्र लिहून देतो/ देते की, ------------------------------------------------------ शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये आमच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक कार्यक्रम अधिकारी/ सहायक कार्यक्रम अधिकारी महिला / अतिरिक्त सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (विद्यार्थी संख्या १०१ किंवा त्यापेक्षा जास्त) यांची नियुक्ती केंद्र व राज्यशासन रासेयो मार्गदर्शक तत्व आणि विद्यापीठ मार्गदर्शक सुचनानुसार केलेली आहे त्यांना रासेयो कामकाजाचे ज्ञान दिलेले असून त्यांनी ते अवगत केलेले आहे. ते आमच्या रासेयो एकाकाचे कामकाज उल्लेखनीय होण्यासाठी केंद्र, राज्यशासन, विद्यापीठ यांच्या दिशा निर्देशाप्रमाणे कामकाज करतील व वेळोवेळी अहवाल,दस्तऐवज सादर करतील अशी आम्ही हमी देत आहोत.

कार्यक्रम अधिकारी (मुख्य/ सहायक/ अतिरिक्त)

प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख